# बल्लारपुर नगर परिषद

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९ (4) व उपविधि अधिनियम 42 (7) अन्वये

## सुधारीत बांधकाम परवाना मंजुरी

प्रति, श्री दिलीप दादाजी मामीडवार
बल्लारपूर,दादाभाई नौरोजी वार,बल्लारपुर

जावक क्र. योजना विभाग/न.प.क्र. 6055
कार्यालय नगर परीषद, बल्लारपूर
दिनांक 30 / 12 / 2017

विषय:- सुधारीत बांधकाम मंजुरी मंजुरी देणेबावत.
संदर्भ: - 1.अर्ज क्र. -- 15417122700010 अर्ज दि. -- 27/12/2017
2. नगर अभियंता यांचा दिनांक _______________ रोजीचा अभिप्राय.

महाशय,

आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक 27/12/2017 रोजी केलेल्या अर्जास अनुसरून या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर हिरवा रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना RBP\00001\2017-18 देणेत येत आहे.

बांधकाम तपशील : बिगर निवासी वापरासाठी (4328.002 चौ.मि.).

बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.नं. | :- शिट न. 10 | त.सा.क्र. / स.नं. (सर्व्हे नं.) | :- 18/147 |
| गट क्र. / ख.क्र./ भूखंड क्र./ विभाग | :- नगर रचना स्किम १ | प्लॉट क्र. | :- |
| रस्ता/प्रभाग क्र./ मोहल्ला | :- | शहर | :- बल्लारपुर |
| | | हिस्सा क्र./ घर क्र. | :- |
| प्लॉटचे क्षेत्रफळ | :- 4125 चौ.मि. | | |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- 4328.002 चौ.मि. | | |
| मजल्याची संख्या | :- 2 | | |

बलश
9166 e 24
2098

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR ★ BALLARPUR ★ दुय्यम निबंधक बल्लारपूर

खास शर्ती / अटीबर

1. आपले सदरहु बांधकाम कोळसा परिसरात आल्यास व पुढे त्यास कोल विभागाने वा शासनाने आक्षेप घेतल्यास त्यास हि नगर परिषद जबाबदार राहणार नाही.
2. हे प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासुन एक वर्ष वैध असेल, मात्र नगर रचना विभागाने सदरचे प्रमाणपत्रास हरकत घेतल्यास किंवा काही मार्ग दर्शविल्यास सदरचे प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे मानण्यात येईल.
3. सदरहु बांधकामामुळे नगर पालिकेच्या विकास योजनेत अगर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यात अडथडे निर्माण झाल्यास बांधकाम तुमचे खर्चाने काढुन घ्यावे लागेल. त्याबद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही.
4. बांधकाम मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालुन दिलेल्या अटिप्रमाणे करावे.
5. मा. जिल्हाधिकारी , चंद्रपुर यांचेकडुन विनतेशी परवानगी घेण्याची जबाबदारी तुमचेवर राहिल. तशी परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम सुरु करु नये.
6. भुखंडाचे बाजुचे हद्दीपासुन आणि मागील बाजुने नकाशात दाखविल्याप्रमाणे अंतर सोडावे.
7. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पुर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळुन आल्यास सदरहु बांधकाम परवानगी रद्द झाले असे समजण्यात यावे.
8. ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे त्या जागेसंबधी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्या संबंधीची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील.
9. बांधकामाचे सामान सार्वजनिक रस्त्यावर नगर पालिकेच्या लेखी परवानगी शिवाय टाकु नये. तसे आढळुन आल्यास कारवाई करण्यात येईल.
10. भुखंडाच्या क्षेत्रापेक्षा जास्त जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
11. रस्त्याचे सपाटीपासुन इमारतीची प्लिंथ (PLINTH) 2 फुटापेक्षा कमी नसावी.

## बल्लारपुर नगर परिषद

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९ (4) व उपविधि अधिनियम 42 (7) अन्वये

12. बांधलेल्या जागेत भरपुर हवा, उजेड व स्वच्छता राहिल अशा तर्हेची सोय असावी त्या बद्लची योग्य ती खबरदारी घ्यावी.
13. बांधकाम पक्क्या स्वरुपाचे असावे. बांधकामामध्ये हलक्या जातीचे सामान गवत, पांगारा वगैरे वापरु नये.
14. ज्या जागेत इमारतीचा नकाशा मंजुर केला आहे त्या जागेत जनावरांचा गोठा बांधु नये.
15. इमारतीचे पाणी इतरत्र न सोडता नगर पालिकेची गटार असल्यास नगर पालिकेचे गटारात नगर पालिकेची परवानगी घेवुन सोडावी. गटार नसल्यास स्वत:चे मालकिचे जागेतच सोकपिट बांधुन योग्य ती व्यवस्था करावी.
16. बांधलेल्या जागेचा उपयोग फक्त ~~राहण्यासाठीच~~, दुकानासाठीच, ~~कारखान्यासाठीच, धान्य दळण्याचे गिरणीसाठीच~~ करावा.
17. हि बांधकामाची परवानगी एक वर्ष चालु राहिल. बांधकाम पुर्ण न झाल्यास परवानगी मुदत वाढवुन न घेतल्यास सदरची परवानगी रद्द झाली असे समजावे.
18. मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे, त्या व्यतिरिक्त ज्यादा बांधकाम अथवा कोणतेही बद्ल केल्याचे निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र पादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 व महाराष्ट्र नगर पालिका नियम 1965 मधील तरतुदिनुसार कार्यवाही करण्यात येईल.
19. सदरहु भुखंडामध्ये कमीतकमी नविन दहा झाडे लावावी व सदर झाडे जतन करावी. त्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.
20. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर न.प. कडुन " बांधकाम वापर प्रमाणपत्र " घेतल्याशिवाय बांधकामाचा वापर सुरु करु नये. तसे आढळुन आल्यास महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम 1965 मधिल तरतुदिनुसार कायदेशीर कार्यवाहि करण्यात येईल.
21. कोणत्याही स्थितीत बांधकाम बंद करण्याचा अगर चालु करण्याचा अधिकार नगर पालिकेने राखुन ठेवला आहे.
22. पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत निचरा होण्याकरिता आपण आपले जागेत कमीतकमी दोन Percolation Pits तयार करणे आपणांस बंधनकारक आहे व छतावरील पावसाचे पाणी जमिनीत निचरा होण्याकरिता Roof Rain Water Harvesting ची व्यवस्था करावी. याबाबत आवश्यक असल्यास नगर परिषद मार्गदर्शन घ्यावे.
23. ज्योत्याचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नगर परिषदेला सुचना द्यावी. बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र नगर परिषद तर्फे घ्यावे. ज्योत्याचे बांधकाम नकाशाप्रमाणे नसल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
24. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे परिपत्रक क्रं. संकिर्ण 2001 / प्रक्र. 410/2001/4 दि. 23 मे 2001 नुसार आपणास भारतीय मानक ब्युरोचे मापदंडाप्रमाणे घराचे बांधकाम भुकंपरोधक उपाययोजना करणे बंधनकारक राहिल. तसेच यासाठी मान्यताप्राप्त अभियंता यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
25. बांधकामात फ्लॉय ऍशचे विटाचा वापर करणे बंधनकारक आहे.
26. वरिलपैकी कोणत्याही अटिचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यावर सदरची परवानगी रद्द करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल आणि परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

येणेप्रमाणे परवाना दिला असे ,

बांधकाम परवाना क्रमांक द. नं. :- RBP\00001\2017-18
दिनांक :- 27/12/2017

प्रत माहितीसाठी
कर निर्धारण अधिकारी
बल्लारपुर नगर परिषद

मुख्याधिकारी
बल्लारपुर नगर परिषद